(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – I ISSN 2277-8063

# महाराष्ट्र पंचायतराजमध्ये महिलांचा सहभाग

**प्रा.डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे,** सहाय्यक प्राध्यापक, महिला कला वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे, जिल्हा-अमरावती. pradipdande@gmail.com

**प्रा. डॉ. प्यारेलाल हरिश्चंद्र सूर्यवंशी,** सहयोगी प्राध्यापक, प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर, जिल्हा -अमरावती pyarelals40@gmail.com

---

''अवं ! सरपंच मीच हाय,
**....**पण पतिराजांपुढे काही चालत नाय, हळूहळू मी बी कारभार समजून घेतेय, म्हणून धावत आले.''



**फोटो : अमेरिका रिटर्न, सरपंच भक्ती शर्मा, एम.ए.राज्यशास्त्र, गाव : बसखेडा अब्दुल्ला, भोपाल (मध्यप्रदेश)**

**'बाया नि पुरुषात फरक नाय।**
**दोघांना अक्कल सारखीच हाय॥ '**

महिला राजसत्ता आंदोलनातील गाण्यातल्या या ओळी कानावर आदळल्यामुळे एका गावातील महिला प्रबोधन करणाऱ्या कार्यकर्त्यांपुढे धावत आली, वरील प्रसंग प्रातिनिधिक आहे. परंतु, हेच पंचायतराजमधील खरे वास्तव आहे. महिला सरपंच असलेल्या गावचे राजकारण कसे चालते यासाठी अमेझोन प्राईम वरील 'पंचायत' वेबसिरीज सर्वांनी पहावी अशी आहे,

७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने महिलांचा राजकारणात प्रवेश झाला? ५० % आरक्षण मिळाले असले तरी परंपरेचा पगडा असलेल्या समाजात महिलांचे राजकारणातील स्थान काय ? महिलांचा राजकारणातील सहभाग म्हणजे नेमका कोणता ? महाराष्ट्रात पंचायतराजमध्ये महिलांचा राजकीय सहभाग किती? हा प्रश्न आहे?

**1. थ्री टायर सिस्टिम**

केंद्रसरकार राज्यसरकार, आणि स्थानिक सरकार अशी त्रि-स्तरीय व्यवस्था आपण स्वीकारली आहे. स्थानिक सरकारात ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, तर शहरी भागासाठी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत अशी उतरंड आहे. ७३ व्या ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे महिलांना ३३ टक्के प्रतिनिधित्व मिळालं आणि महिलांचा थेट राजकीय सहभाग सुरू झाला. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधलं हे लोकप्रतिनिधित्व ५० टक्क्यांवर गेलं. आज देशातल्या वीस राज्यात महिलांना ५०% आरक्षण आहे. घरात- शेतात राबण्यापलीकडे दुसरं काहीही जीवन नसलेली, सत्तेच्या उतरंडीत कुणाच्याही खिजगणतीतही नसलेली, निर्णयप्रक्रियेत कोणतंही स्थान नसलेली महिला पंचायतराजमुळे अचानक सत्तेच्या प्रकाशझोतात आली. गेल्या पंचवीस वर्षांत शहरांसोबतच ग्रामीण भागातही महिला सरपंचांपैकी काहींनी दारूबंदीच्या लढाईलाही मूर्तस्वरूप दिले. ग्रामसभा घेतल्या, दारूबंदीचे ठराव पारित केले व गावपातळीवर समाज सुधारायचा प्रयत्न करीत आहे.

**2. महिलासाठी पंचायतराजची काही वैशिष्ट्ये**

1. महिलांना ३३% आरक्षण मिळाले.
2. आज २० राज्यात ५० % महिला आरक्षण आहे.
3. प्रत्येक गावातली अर्ध्या ग्रामपंचायतवर महिलांचा कब्जा आहे.
4. SC, ST, ओबीसी महिला/ पुरुषांना संधी मिळाली.
5. परंपरेने 'पाळण्याची दोरी' असणाऱ्या महिलांच्या हातात 'गावच्या विकासाची दोरी' आली.
6. अशिक्षितपेक्षा, शिक्षित महिलांचे प्रमाण अधिक.
7. पंचायतराजमुळे गावची सरपंच, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, महापौर, नगराध्यक्ष झाली .

**3. मत किंवा मृत्यु**

इंग्लंडमध्ये १९ व्या शतकाच्या सुरुवातीला (१९१३) झालेल्या आंदोलनात मताचा अधिकार मागणाऱ्या आंदोलक महिलांचा नारा होता "Vote Or Death' 'एकतर मत द्या, नाही तर मृत्यू द्या'. इंग्लंडमध्ये मताचा अधिकार मागण्यासाठी महिलांनी केलेल्या आंदोलनात अनेक महिलांचा बळी गेला. इंग्लंडचा राजा जॉर्ज सहावा याच्या घोड्याने आंदोलक महिलांना चिरडले. दुसरीकडे अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांत निग्रो महिलांना शंभर वर्षाच्या संघर्षानंतर (१९६५) मताचा अधिकार मिळाला. सौदी अरेबियात २०१७ ला महिलांना मतांचा अधिकार मिळाला. भारत हा जगातील पहिला देश ज्याने आपल्या संविधानात (१९५०) पुरुषाच्या बरोबरीने महिलांना मतदानाचा अधिकार दिला आहे. भारतात मताच्या अधिकारासाठी महिलांना संघर्ष करावा लागला नाही.




इंग्लंडमध्ये मताच्या अधिकारासाठी १९१३ च्या आंदोलनातील एक फोटो, अनेक वर्षाच्या आंदोलनामुळे १९२८ पासून महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.

**4. महिलांचा राजकारणात सहभाग**


जागतिक राजकारण ते स्थानिक राजकारणात महिलांचा प्रवेश झाला असला तरी पंचायतराज सोडता लोकसभा विधानसभेत तील टक्केवारी कमीच आहे. (ग्राफ १)

**महिलांचा राजकारणात सहभाग एक दृष्टीक्षेप↓** ↓ ↓

1) जागतिक राजकारणात **25%** 2) लोकसभा / विधानसभा **12%** 3) पंचायतराज **50%**

**5. महाराष्ट्र पंचायतराजमध्ये महिलांचा सहभाग**

**महाराष्ट्र पंचायतराज दृष्टीक्षेपात (ग्राफ २)**




महाराष्ट्राच्या पंचायत राजचा आकृतिबंध 28,हजार 563 इतका आहे. यात महाराष्ट्रात १४ हजार महिला सरपंच, दीडशेवर महिला पंचायत सभापती आणि सतरा जिल्हा परिषदांच्या महिला अध्यक्षा, सतरा महापौर, शंभर हून अधिक नगराध्यक्ष यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थांत निवडून आलेल्या महिला सदस्यांची संख्या मोजली तर या सगळ्या राज कारभारणींचा आकडा एक लाखाहून अधिक आहे. अमरावती विभागाचा विचार केल्यास अमरावती ,अकोला,बुलढाणा,वाशीम,यवतमाळ जिल्ह्यात 4110 ग्राम पंचायती आहेत.तर अमरावतीत 834 ग्रामपंचायती आहेत. अमरावती जिल्ह्यात 417 ग्रामपंचायतमध्ये महिला सरपंच आहेत.देशात २.५० लाख (अडीच लाख) ग्रामपंचायत आहेत. देशभर महिला लोकप्रतिनिधींची संख्या २० लाखाहून अधिक आहे.

**6. 'पंचायत टू पार्लमेंट' नेमका सहभाग कोणता ?**

स्त्रियांचा राजकारणातील सहभाग म्हणजे नेमका कोणता सहभाग ? स्त्रियाना प्रतीकात्मकच सहभाग मिळाला आहे का? स्त्रियांचे बोलविते धनी पुरुषच आहेत का? पुरुषप्रधान राजकारणाच्या क्षेत्रात पुरुषांचा नाइलाज होऊन त्यांनी स्त्रियांना बरोबर घेतलंय का? स्त्रिया म्हणजे नक्की कोणत्या स्त्रिया? मुख्यमंत्री, राजकारणी नेते यांच्या पत्नी, मुली, सुना अशा परिवारातील स्त्रिया, की गावपातळीवरच्या सरपंच स्त्रिया? सामान्य स्थितीतून तिकिटे मिळवून निवडून आलेल्या स्त्रिया? या सर्व प्रश्नांवर एकसुरी, एकछापाची उत्तरे नाहीत.

आजकाल निवडून येणाऱ्या महिला लोकप्रतिनिधिचा सहभाग हाच राजकारणात गृहीत धरल्या जातो. तीच महिलांच्या राजकारणाची फुटपट्टी मोजल्या जाते. खऱ्या अर्थाने महिलांचा राजकारणातील सहभाग हा केवळ महिला लोकप्रतिनिधीत्वापुरता मर्यादित नाही. निवडणूक लढणे म्हणजेच केवळ राजकारण नाही, राजकारणाबद्धल मत व्यक्त करणे, मतदान करणे, पक्षकार्यात सहभागी होणे, म्हणजेही राजकारण होय.ज्या निवडणुकीत लढल्या पण हरल्या त्यांची संख्या ५० लाखाहून अधिक आहे, तोही राजकारणातील सहभाग आहे. महाविद्यालयीन तरुणींमध्ये राजकारणाप्रती असणारी अनास्था लक्षात घेता लोकशाहीला अपेक्षित सजग समाज निर्माण व्हावा म्हणून आमच्या महाविद्यालयात चालविल्या जाणारा 'पंचायत टू पार्लमेंट' हा उपक्रम त्याचाच एक भाग आहे.

**7. पुरुषांच्या बरोबरीने मतदान**

संविधानाने महिलांना मताचा अधिकार दिल्यामुळे ती पुरुषाच्या बरोबरीने मतदानात सहभागी होत आहे. 1952 साली असणार महिला मतदानाचे प्रमाण २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत दुपटीहून अधिक वाढले आहे. 2019 लोकसभा निवडणुकीत पुरुष 67.03% तर महिला 67% मतदान झाले. महिलांच्या तुलनेत पुरुष केवळ .0.3 टक्क्याने पुढे आहेत. पाणी, आरोग्य, विकासाच्या योजना, पायाभूत सुविधा, स्वच्छतागृहे, बचतगट, महिला सुरक्षितता, लिंगनिदान करून स्त्री-

भ्रूणहत्या, भाजी, मंडया व त्यातील स्वच्छता, दिव्यांचा अभाव यांसारख्या प्रश्नांवर लक्ष ती वेधत आहे. झगडत, संघर्ष करत, स्वत:ला सिद्ध करत स्त्रीने निदान स्त्रियांसाठी तरी राजकारणात जागा निर्माण केली आहे. महिलांचा राजकारणातील सहभाग हा आज घडीला अचंभित करणारा ठरत आहेत. प्रत्येक राजकीय पक्षानला आपल्या महिला आघाड्या तयार कराव्या लागल्या आहेत. निवडणूक कोणतीही असो, महिला ह्या प्रचाराला हव्याच. कोणत्याही पक्षाची प्रचार रेली, सभा महिलाशिवाय होत नाही,किंबहुना तिचा सहभाग पुरुषांच्या तुलनेत अधिक असल्याचे अनेक प्रचार सभातून दिसून आले. तिच्या या सहभागामुळे तिला राजकीय भान आले आहे.

**8. चवथी खुर्ची ?**

महिला सरपंच असलेल्या गावात ग्रामपंचायत च्या बैठकीत चवथी खुर्ची असतेच असते. ती खुर्ची कुणाची ? तर ही सरपंचाची, ही उपसरपंचाची, ही ग्रामसेवकाची. या सर्व खुर्च्यासोबत अशीच एक चौथी खुर्ची अनेक गावांत आहेत. ती चवथी खुर्ची असते महिला 'सरपंच पती' ची .

यावरून, महिला लोकप्रतिनिधींचं प्रतिनिधित्व असं बदलाच्या वाटेवरून जाणारं असल्याने सगळ्याच गोष्टी असायला हव्यात तेवढ्या आलबेल नाहीत. लहान लहान गोष्टींसाठीचा संघर्ष अजूनही संपलेला नाही. एक टप्पा पार केला आहे, असं वाटत असतानाच नवी आव्हान पुढे येत आहेत.




**9. शिक्षित महिलांचे प्रमाण अधिक**

पंचायतराजच्या एका अभ्यासात पंचायत पातळीवर महिला नेतृत्वाचं वय सरासरी तरुण आहे. पंचायतराजमध्ये ठार निरक्षर, दलित, आदिवासी महिलांनाही सत्तेच्या पायऱ्या चढता आल्या. आता ग्रामीण भागात निरक्षर महिले पेक्षा पेक्षा शिक्षित व उच्चशिक्षित, एम.ए.,एम.एस.सी, एम.बी.ए. झालेल्या महिला राजकारणात येत आहेत. तर शहरी भागात, डॉक्टर, प्राध्यापक, वकील, इंजिनियर महिला नगरसेवक, महापौर,नगराध्यक्ष झाल्यात.प्रीती शेजवळ जी. नाशिक ही भगिनी महाराष्ट्रातील पहिली एम.बी.ए. सरपंच आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तर नाशिक,पुणे, मुंबई येथील नगरसेविका आमदार झाल्या. गाव पातळीवर आर्थिक सत्ता नसलेल्या महिलाही सत्ताकेंद्रात येऊ शकतात, येत आहेत, हेच या गोष्टीने दाखवून दिले आहे.

**10. 'पर्सनल इज पोलिटिकल'**

गावातल्या राजकारणात कायमच दबलेली, आपल्याला आवाजच नाही, राजकारण हे पुरुषांचंच काम असं मानत आलेली महिला ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका-महानगरपालिकांचा उंबरठा ओलांडताना सुरुवातीला बिचकली. सुरुवातीला कुणाची पत्नी, कुणाची मुलगी, कुणाची बहीण असं नातं घेऊन ती आली तर कधी नाव तिचं आणि काम तिच्या नवऱ्याचं असंही झालं. पण आता गेल्या पंचवीस वर्षांत पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलंय. पाण्याचा प्रश्न,

शाळा, वीज दलित वस्तीत सोयी, गावातले रस्ते अशा प्रश्नांना या स्त्रियांनी हात घातला आणि ती कामं करून घेतली. 'पर्सनल इज पोलिटिकल' म्हणजेच जे जे प्रश्न तुमचे असतात, तेच सगळ्या समष्टीचे असतात, हा प्रत्यय या महिलांनी आणून दिला.

महिला लोकप्रतिनिधींचं प्रतिनिधित्व असं बदलाच्या वाटेवरून जाणारं असलं तरी सगळ्याच गोष्टी असायला हव्यात तेवढ्या आलबेल नाहीत. लहान लहान गोष्टींसाठीचा संघर्ष अजूनही संपलेला नाही. एक टप्पा पार केला आहे, असं वाटत असतानाच नवी आव्हान पुढे येत आहेत.

**11. "स्टे इन युवर लेन"** अर्थात उंबरठ्याच्या आतच रहा !

राजकारण बाया- बापड्यांच काम नव्हे,अशी हेटाळणी महिला कारभारणीची होते. गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, बिहार उत्तरप्रदेश सारख्या राज्यात पुरुष प्रधान संस्कृतीच्या पगड्यामुळे महिला सरपंच असली तरी ती केवळ नावाचीच आहे. हेच 'पंचायत' या वेबसिरीज मध्ये दाखविले आहे. पुरोगामी म्हणणाऱ्या महाराष्ट्रात ते प्रमाण कमी असले तरी ...उंबरठ्याच्या आतच रहा, असे म्हणणाऱ्याचे प्रमाण काही कमी नाही. परन्तु , सरकार, यशदा, महिला राजसत्ता आंदोलन सारख्या सामाजिक संस्थांनी प्रशिक्षण दिलं. तिलाही अनुभव येत गेले, सत्तेची चव तिनेही चाखली तसतशी परिस्थिती बदलत आहे.

**12. प्रशिक्षणाचा अभाव**

स्थानिक सरकारचे काम भारताचे संविधान, केंद्रसरकार व राज्य सरकारांनी पारित केलेले कायदे यानुसार चालते. उदा. ग्रामपंचायतसाठी ग्रामपंचायत अधिनियम 1958, महानगरपालिकेसाठी 'महाराष्ट्र महानगरपालिका कायदा 2011 (सुधारित)', तर ZP साठी जिल्हा परिषद कायदा, आणि नगरपालिकेसाठी 'नगरपालिका कायदा' अशा कायद्यानुसार पंचायतराजचा कारभार चालतो. ते कायदे, त्याचे नियम, उपनियम, शासन आदेश,GR (Government Resolution), परिपत्रक, तसेच राज्य सरकारचे कायदे, संविधानातील तरतुदी याचे ज्ञान निवडून आलेल्या प्रत्येक स्त्री/पुरुषांना असेलच असे नाही. त्यामुळे सरपंच झाले, महापौर झाले, ZP अध्यक्ष झाले तरी कायद्याचे सखोल ज्ञान माहित नसल्याने ते आपला प्रभाव पाडू शकले नाहीत / शकत नाही. यात महिला म्हटल्या तर त्याहून मागे आहेत. त्यामुळे पंचायतराज मधील महिला नेतृत्वाला मिळणार अपूर प्रशिक्षण, कायदे नियमांचे अपूर ज्ञान, पतिराजांचा प्रभाव, पक्षाचे धोरण ह्या महिला प्रतिनिधी पुढील अडचणी आहेत.नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य यांना ओळख पत्र दिले जाते परंतु पंचायत राज मधील शेवटचा आणि महत्वाचा घातक म्हणून काम करणाऱ्या सरपंचाना साध ओळखपत्र मिळत नाही. महिला सरपंच एखाद्या कार्यालयात गेल्यास तुम्ही कशावरून त्या गावच्या सरपंच? असा प्रश्न विचारल्या जात असल्याचे अनेक सरपंचानी प्रत्यक्ष भेटीत सांगितले,

तर दुसरीकडे, पंचायत पातळीवर महिलांना हक्काच्या ५० % जागा असल्यामुळे त्यांचा राजकारणात सहभाग वाढला असला तरी निवडणुकीच्या पातळीवर तिची निवडणूक जिंकण्यासाठी प्रयत्न करणारा तिचा पती, कुटुंब व त्यांचा पैसा, गावचे राजकारण यामुळे, तिलाही भ्रष्टाचाराची लागण लागल्याची अनेक उदाहरणे आहेत. परिणामतः गावचा कारभार पुरुषांच्या तुलनेत अधिक पारदर्शक होईल ही अपेक्षा फ़ोल ठरली आहे. असे असले तरीही 'बाई झाली सरपंच, तिचा वाया गेला प्रपंच' – या मानसिकतेकडून हळूहळू.. 'बाई झाली सरपंच, सुधारला गावचा प्रपंच' अशी बदलती गाव परिस्थिती सगळीकडे दिसू लागली, बदल घडत आहे हे चित्रही महिलांच्या राजकारणात सहभागासाठी आणि गावच्या विकासासाठी आशादायी म्हणावे लागेल.

**निष्कर्ष :**

पंचायतराजमध्ये महिला पदाधिकारी असूनही तिचा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग (Policy decision making process) नगण्य स्वरूपाचा आहे. परंतु, पंचायतराज व्यवस्थेत महिला सहभागाचे प्रमाण वाढले आहे / वाढत आहे.आपण स्वीकारलेल्या लोकशाही मुले पंचायतराज मध्ये अत्यंत गरीब, निरक्षर,दलित, आदिवासी महिलांना सरपंच, महापौर, उपमहापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष होता आले हे पंचायतराजचे यश आहे. लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण, तसेच त्यांच्या छोट्या मोठ्या अडचणी सोडविल्या तर सरकार व जनता (ट्रस्टी व स्टेक होल्डर ) यांच्यातील परस्पर सहकार्य व सुसंवाद लोकतांत्रिक विकासाच्या दृष्टीने मदतगार सिद्ध होईल.

**संदर्भ :**

1) ipu.org 2) संसद वेबसाईट 3) पंचायत राज मंत्रालय व नगर विकास मंत्रालय